**राज्यातील लॉकडाऊन परिस्थितीमध्ये अतिरीक्त दुधाचे नियोजन योजनेंतर्गत मागणी क्र. डी-५, मुख्य लेखाशीर्ष-२४०४ खालील मंजूर पुरवणी मागणीचे निधी वितरण.....**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः - पूरक-२०२०/प्र.क्र. १२५/पदुम-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : २२ जानेवारी, २०२१

**वाचा:-**

१) शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र.१/पदुम-८, दि. ३/०४/२०२०
२) शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र.१/पदुम-८, दि. २७/०४/२०२०
३) शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र.१/पदुम-८, दि. २९/०६/२०२०
४) शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र.१/पदुम-८, दि. ९/०७/२०२०
५) शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र.१/पदुम-८, दि. १२/५/२०२०
६) शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र.१/पदुम-८, दि. २४/७/२०२०.
७) शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र.१/पदुम-८, दि. २७/८/२०२०.
८) महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०२० (सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-१८) शासन राजपत्र असाधारण, भाग-४, दिनांक १०.९.२०२०
९) शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र.१/पदुम-८, दि. २२/९/२०२०.
१०) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.९८/पदुम-८, दि.१८/११/२०२०.

**प्रस्तावना:-**

राज्यातील लॉकडाऊन परिस्थितीमध्ये निर्माण झालेल्या अतिरीक्त दुधाचे नियोजन करण्यासाठी प्रतिदिन १० लक्ष लिटर दुध स्विकृती व सदर दुधाचे रूपांतरण दुध भुकटीमध्ये करण्याची योजना संदर्भ क्र. १, २ व ३ येथील शासन निर्णयान्वये दिनांक ६.४.२०२० ते दि.३१.७.२०२० या कालावधीकरिता राबविण्यात आलेली होती. त्याकरिता एकुण रु.१९०.३० कोटी इतका निधी आकस्मिकता निधीद्वारे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर मान्यतेनुसार संदर्भ क्र.५, ६, ८, ९ व १० येथील शासन निर्णयान्वये एकूण रु.१९०.३० कोटी इतका निधी अंमलबजावणी यंत्रणेस वितरीत करण्यात आला आहे. सदर योजना संदर्भ क्र.७ येथील शासन निर्णयान्वये दि. १ सप्टेंबर, २०२० ते दि. ३१ ऑक्टोबर, २०२० या कालावधीकरिता पुनश्च: राबविण्याचा निर्णय घेऊन त्यासाठी रु.२१६.०६ कोटी इतक्या आर्थिक तरतूदीस मान्यता देण्यात आली आहे. सदर मंजूर रु.२१६.०६ कोटी इतक्या निधीपैकी रु.३४.७० कोटी इतका निधी संदर्भ क्र.१० येथील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. आता, सदर योजनेंतर्गत रु.२५.०० कोटी इतका निधी वितरणासाठी वित्त विभागाने उपलब्ध करुन दिला असल्याने, सदर

निधी "व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ (महानंद)" या योजनेच्या अंमलबजावणी यंत्रणेस वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

शासन या निर्णयान्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ (महानंद) या अंमलबजावणी यंत्रणेस वित्त विभागाने उपलब्ध करुन दिल्यानुसार रु.२५.०० कोटी इतका निधी संदर्भ क्र. ७ येथील शासन निर्णयान्वये राबविण्यात आलेल्या योजनेवरील खर्च भागविण्याकरिता वितरीत करण्यास मान्यता देत आहे.

सदर निधीचा विनियोग "मागणी क्रमांक डी-५, २४०४-दुग्धव्यवसाय विकास ००, १०२, दुग्धव्यवसाय प्रकल्प, (०५) दूध व दूध भुकटी करिता अनुदान, (०५)(०१) - अतिरिक्त दूधाचे रुपांतर व निर्यात करिता अनुदान, ३३-अर्थसहाय्य, (२४०४ ४१११) " या लेखाशीर्षाखाली करण्यात यावा.

प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २२/व्यय-२, दिनांक १९.१.२०२१ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०१२२१६००३९५५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Shaligram Govil

Digitally signed by Rajesh Shaligram Govil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c549410b2251df8c92783a2da17afcacbe7f8fe3a4fd88f156fea84433871f11, serialNumber=3cec7a5cf8d124a0d8e15bfc85a782c01ef27eaee8bedaba4dce3416562097ac, cn=Rajesh Shaligram Govil
Date: 2021.01.22 16:06:08 +05'30'

**( राजेश गोविल )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा. मंत्री (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
४. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
५. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय,मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय,मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय,मुंबई.
८. प्रधान सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई.
९. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
१०.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या, मुंबई.
११. महालेखापाल, महाराष्ट्र ½, (लेखा व अनुज्ञेयता व लेखापरीक्षा) , मुंबई/नागपूर.

१२.अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे, मुंबई.

१३.निवासी व लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.

१४.सर्व प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी.

१५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

१६.वित्त विभाग (व्यय-२, अर्थसंकल्प-१५), मंत्रालय, मुंबई.

१७.कक्ष अधिकारी (पदुम-१६), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

१८.निवडनस्ती (पदुम-८)